ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

EIIRJ

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष आणि लोकशाही पुढची आव्हाने

* डॉ. माधव नरहरी कांबळे,

* संभाजीराव केंद्रे महाविद्यालय जळकोट जि. लातूर

**प्रास्ताविक**

औद्योगिक क्रांतीच्या काळात युरोप खंडातील सरंजामशाही आणि राजेशाही यांची विचार होऊन लोकशाहीचा उदय होऊन एका नव्या पर्वाला सुरुवात झाली या लोकशाहीला प्रजासत्ताक असेही संबोधले जाते. या शासनव्यवस्थेत लोकांच्या हाती अंतिम सत्ता असून व्यक्ती हा केंद्रस्थानी असतो. प्रत्येक व्यक्तीच्या मताला येथे किंमत असते लोकशाहीत एक मत आणि एक मुल्य ही व्यवस्था अस्तित्वात असल्यामुळे नागरिकातील मानवनिर्मित विषमता नष्ट होऊन सामाजिक, राजकीय व आर्थिक समता प्रस्थापित होऊन नागरिकात बंधूभाव, सहिष्णुता व न्यायाधिष्ठित समाज निर्माण करणे शक्य होईल.

लोकशाही ही संकल्पना भारतात अडीच हजार वर्षापासून अस्तित्वात आहे प्राचीन भारतामध्ये वैशाली राज्यात लोकशाही शासन व्यवस्था अस्तित्वात होती याची उदाहरणे आपणास पाहावयास मिळतात. जसे संघ आणि गणांची उदाहरणे ही प्राचीन भारतात लोकशाही अस्तित्वात होती याचे पुरावे आहेत याचाच अर्थ भारत आणि लोकशाही यांचा प्राचीन काळापासून संबंध असल्याचे दिसून येते.

भारतीय लोकशाही ही जगातील यशस्वी लोकशाही म्हणून ओळखले जाते आपली लोकशाही ही एक जीवन पद्धती व जीवन मार्ग असून तो स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या श्रेष्ठतम मूल्यावर आधारलेला असल्यामुळे एकविसाव्या शतकातील एक आदर्शवादी लोकशाही म्हणून तिची गणना केली जाते परंतु बदलत्या काळाप्रमाणे भारतीय लोकशाही व्यवस्थेत समोरही अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत त्या आव्हानांचा विचार करून त्यावर उपाययोजना आखणे गरजेचे झाले आहे.

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**संशोधनाचे उदिष्टे :-**

१) लोकशाहीचा अर्थ स्पष्ट करणे

२) भारतीय लोकशाही समोरील आव्हानांचा अभ्यास करणे

३) भारतीय लोकशाही अधिक बळकट होण्यासाठी उपाय योजना सुचवणे.

**संशोधन पद्धती :-** प्रस्तुत संशोधन पेपरसाठी संशोधनाच्या एकूण चार पद्धती पैकी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

**लोकशाहीचा अर्थ:-**

लोकशाहीला इंग्रजीमध्ये Democracy असे म्हणतात Democracy हा शब्द Demos आणि Kratia या दोन ग्रीक शब्दापासून बनला असून Demos म्हणजे लोक आणि Kratia म्हणजे सत्ता या दोहोंचा एकत्रित अर्थ लोकांची सत्ता म्हणजे लोकशाही असा होतो.

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

**१) स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष का साजरे करावे**

भारतावर इंग्रजांनी दीडशे वर्षे राज्य केले या वसाहतवादाच्या विरोधात लढा देऊन ब्रिटीश राजवट ठप्प करण्यासठी स्वातंत्र्यपूर्व काळात असहकार आणि सत्याग्रह यांचा अवलंब करण्यात आला. ब्रिटीश सरकार हटविण्यासाठी अनेक क्रांतिकारक, महापुरुष व कित्येकांनी मृत्यूला कवटाळले, संगिनीच्या गोळ्याही झेलल्या, कारावास भोगले. या वसाहतवादाच्या विरोधात लढा देऊन स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी क्रांतिकारकाना कोणती किंमत मोजावी लागली आहे याची जाणीव आजच्या पिढीला करुन देण्यासाठी हा अमृत महोत्सव साजरा करणे आवश्यक आहे.

**२) स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा पंचाहत्तर वर्षांचा प्रवास**

आपला देश अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करत असताना या पंचाहत्तर वर्षात आपण काय कमावलं काय गमावलं याचा विचार करणे गरजेचे ठरते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा पंचाहत्तर वर्षांचा प्रवास आपल्या देशासाठी नक्कीच आव्हानांचा राहिलेला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर निर्वासितांचे प्रश्न, धार्मिक दंगली, बेरोजगारी, सामाजिक विषमता, शेतीविषयक, शिक्षण विषयक, संस्थान विषयक, अशा विविध समस्यांना भारताला सामोरे जावे लागले आहे.

आपल्या देशाला प्राचीन संस्कृतीचा वारसा लाभला असून आज विश्वात भारत देश सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य म्हणून ओळखला जातो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या नेतृत्वाखाली देशाने लोकशाही विचारसरणीचा स्वीकार करून पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून आपल्या देशाचा पाया मजबूत केला आहे. भारतीय जनतेने गेली 74 वर्षं ही लोकशाही व्यवस्था मतदानाच्या रूपाने संवर्धित करून टिकवून ठेवली आहे ही आपल्यासाठी अत्यंत अभिमानास्पद व गौरवशाली गोष्ट आहे.

आज भारतीय स्वातंत्र्याला 74 वर्ष होऊन आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना देशापुढील आव्हानांचाही विचार करणे गरजेचे ठरते. आज लोकसंख्या, गरिबी, स्वच्छता, भ्रष्टाचार, तसेच धर्म, प्रांत, भाषा आणि लिंगाधारित भेदाभेद, अतिरेकी राष्ट्रवाद, धर्मांधता, सामजिक व आर्थिक विषमता अशी अनेक आव्हाने आजही कायम आहेत. आजही देशात अनेक भागात अन्न, पाणी, वस्त्र, निवारा, शिक्षण, वीज, रस्ते, आरोग्य या मुलभूत सुविधा सुद्धा पोहोचलेल्या दिसून येत नाहीत. समाजात भय, असुरक्षितता, हिंसा अत्याचार, बलात्कार, भ्रष्टाचार वाढत असेल तर आपल्या देशात लोकशाही व्यवस्था आहे की नाही असा प्रश्न पडायला लागतो.

भारताबरोबर अनेक देश वसाहतवादाच्या जोखडातून मुक्त होऊन भारताप्रमाणे त्या देशातही लोकशाही व्यवस्था निर्माण करण्यात आली होती परंतु आज त्या देशांमध्ये लोकशाहीची जागा हुकूमशाही व्यवस्थेने घेतलेली दिसून येते. त्यामुळे आपल्याही देशात त्या प्रकारची परस्थिती निर्माण होऊ नये यासाठी स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करत असताना लोकशाहीपुढची आव्हाने व उपाय योजना याचा विचार करणे गरजेचे ठरते.

**लोकशाही पुढची आव्हाने**

1) **अतिरेकी राष्ट्रवाद** :- स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा राष्ट्रवाद हा उदारमतवादी स्वरूपाचा होता. समाजात अनेक विचारसरणी अस्तित्वात असल्या तरी लोककल्याण व राष्ट्रप्रगती हेच त्यांचे ध्येय होते. परंतू आजचा राष्ट्रवाद हा अतिरेकी स्वरूपाचा बनत असून हा लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे. या अतिरेकी राष्ट्रवादाची परीनीती ही लोकशाहीच्या पतानामध्ये होऊ शकते.

2) **धर्मांधता** :- धर्मांधता ही भारतीय लोकशाही मार्गातील फार मोठा अडसर असून आज भारतात राजकीय मंडळी स्वतःचा स्वार्थ साध्य करण्यासाठी वेगळ्या स्वरूपाचे धर्मकारण करून समाजात देशात धार्मिक कलह निर्माण करत असल्यामुळे भारताचे राष्ट्रीय हॉकी धोक्यात येत आहे त्यामुळे प्रत्येक भारतीयांनी या धर्मांध विचारसरणीत बंदिस्त न होता मानव तितुका एकच आहे ना कोणी ना कोणी आहे मानवता हाच खरा धर्म आहे ही माणसा बनवण्यास एकसंघ भारत होण्यास मदत होईल अथवा स्वातंत्र्यप्राप्ती सगळी धर्मावरून जसे पाकिस्तान व भारत हे दोन राष्ट्र बनले त्याचप्रमाणे विविध धर्मावरून भारताची अनेक शकले पडू शकतात. त्यामुळे भारतीय लोकशाहीसाठी घातक ठरू शकते.

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

3) **जातीयवाद:-** भारतातील सामाजिक स्तरीकरण हे प्रामुख्याने जाती व्यवस्थेवर आधारित असून पारंपरिक भारतीय समाजावर जातीव्यवस्था जबरदस्त पगडा दिसून येतो जातिव्यवस्थेने भारतातील समाजाचे आणि अनेक गटात विभागणी केली असल्यामुळे आज भारतातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, वैद्यकीय व राजकीय अशा सर्वच क्षेत्रात जातिवाद बोकाळला आहे. पुर्वी जात होती पण जातिवाद नव्हता,आज जात नष्ट होत असताना जातीयवाद मात्र वाढत चालला आहे. जातिवादी राजकारण जातीय संघटना पक्ष जातीय सामने ही जातीयवादाला खतपाणी घालणारे घटक असून यांना दूर सारून प्रत्येकाच्या मनात स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मानवी मूल्यांची जोपासना केल्याशिवाय भारतीय लोकशाहीची प्रगती होणार नाही. म्हणून जातीवाद हा भारतीय लोकशाही समोरचे मोठे आव्हान ठरत आहे.
4) **सामाजिक व आर्थिक विषमता:-** स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात सामाजिक व आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात होती परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सामाजिक व आर्थिक समतेची प्रस्थापना होणे हे भारतीय राज्यघटनेचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते परंतु आजही स्वातंत्र्यप्राप्तीच्या 74 वर्षांनंतरही सामाजिक व आर्थिक विषमतेचा मोठा धोका भारतीय लोकशाही व्यवस्थेसमोर निर्माण झाला आहे. भारतात जात, धर्म, पंथ, लिंग, वर्ण, समूह, श्रीमंत-गरीब, दर्जा, प्रतिष्ठा व समूहाच्या आधारावर आजही भेदाभेद केला जातो. भारतीय राज्यघटनेने सामाजिक समता निर्माण केली असली तरी वास्तवात मात्र मोठ्या प्रमाणात समाजात आजही विषमतेचे विष पेरले जात असल्यामुळे देशात जातीय हिंसाचार, धार्मिक दंगली, जाळपोळ मोठ्या प्रमाणात घडताना दिसून येत आहे. समाजात स्वतःस श्रेष्ठ समजून घेणारे काही उच्च वर्णीय लोक कनिष्ठ जातीतील नवरदेवाने घोड्यावर बसणे, देवळात जाणे, मंदिरात दर्शन घेणे आजही मान्य करत नाहित तसे घडले तर त्यास मारले जाते, त्यांच्यावर बहिष्कार टाकला जातो त्यामुळे आपण सर्वजण एक आहोत ही भावना जोपर्यंत जोपासली जाणार नाही तोपर्यंत आपले राष्ट्र एकसंघ होणार नाही हे निश्चित. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी आपल्या देशातील जातीयता नष्ट होऊन एकता निर्माण असली पाहिजे.
5) **व्यक्तिस्वातंत्र्य** – व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे केवळ शासनाच्या हस्तक्षेपापासून मुक्तता असा संकुचित अर्थ नाही तर व्यक्तिची सामाजिक व आर्थिक शोषणापासून मुक्तता असा घेतला जातो. त्यामुळे प्रचलित सामाजिक व्यवस्था जर असे शोषण होण्यास पोषक असेल तर ती बदलणे हे ही शासनाचे व समाजाचे कर्तव्य आहे. समाजात सामाजिक व आर्थिक शोषण होत असेल तर व्यक्तीच्या व्यक्ती स्वातंत्र्याला अर्थ उरत नाही.

**सारांश**

लोकशाहीचे बीज भारतीय संविधानात रुजले आहे.२६ जानेवारी १९५० रोजी संविधान देशात लागू होऊन सत्ता प्रजेच्या हातात वर्ग झाली. म्हणून आपण हा दिवस प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करतो. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर झालेल्या या बदलांचे परीक्षण करून पाहीले असता असे लक्षात येते की, देशात सकारात्मक आणि नकारात्मक बदल झालेले आहेत.

स्वतंत्र भारताने गेल्या सात दशकांत वैज्ञानिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक सांस्कृतिक आणि धार्मिक अशा सर्वच क्षेत्रांत मोठी प्रगती केली आहे. न्याय्य आणि समानतेवर आधारित विश्वाची निर्मिती करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. तरीही आपण लोकांच्या रोटी-कपडा आणि घर या मुलभुत गरजा देखील अद्याप पुर्ण करू शकलो नाहीत. कुपोषण व भुकबळीची आकडेवारीवर नजर टाकल्यास मान शरमेने खाली जाते. प्रचंड संख्येने असलेल्या गरिबांचे पोट भरणे, अशिक्षितांच्या मोठ्या लोकसंख्येला शिक्षण, आरोग्य अशा मूलभूत सुविधा देऊन जगभरातील तांत्रिक आणि आर्थिकदृष्ट्या समृद्ध असलेल्या देशांशी स्पर्धा करून आपले स्थान निर्माण करण्याचे आव्हान या लोकशाहीवादी देशापुढे उभे राहिले आहे.

लोकशाही निर्माण करणे ही अत्यंत अवघड प्रक्रिया असून ते टिकवणे त्यापेक्षाही महान कठीण काम आहे. स्वतंत्र, समता, न्याय, बंधुत्व, या मुलतत्वावर भारतीय लोकशाही टिकून आहे. लोकशाही ही चार खांबावर अवलंबून असते त्यात समाजमाध्यमे या पाचव्या स्तंभाची भर पडली असली तरी ही सर्व खांबे आज विशिष्ट व्यक्ती समूहाच्या नियंत्रणाखाली काम करत असलेले दिसून येत आहेत. आज विरोधकांना संपवण्यासाठी साम-दाम-दंड-

भेद व सरकारी यंत्रणांचा वापर केला जात आहे. लोकशाहीमध्ये विरोधी मतांचा आदर झाला पाहिजे पण तसे आज होताना दिसून येत नाही. दलितांवर अत्याचार वाढत चालले आहेत. शेतकऱ्यांच्या चळवळी चिरडण्याचा प्रयत्न होताना दिसून येत आहे. आज राजकारणात संस्कारित, शिक्षित, निस्वार्थी व्यक्तीपेक्षा भ्रष्ट आणि गुंड पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना मुख्यमंत्रीपदी, राज्यपालपदी बसवले जात आहे ही लोकशाहीची क्रूर चेष्टा असून हे असेच चालत राहिले तर देशातून लोकशाही हद्दपार होण्यास वेळ लागणार नाही.

**उपाय योजना**

देशापुढील ही प्रचंड आव्हाने पेलण्यासाठी आणि त्यातून मार्ग काढण्यासाठी एक राष्ट्रीय अजेंडा तयार करणे आवश्यक आहे. बेटी बचाओ, बेटी पढाओ मोहीम राबवून देखील स्त्रीभ्रूण हत्येसारखे प्रकारच अधिक वाढल्याचे दिसते. हे गंभीर वास्तव असून, ते बदलायला हवे. देशभर सर्वत्र पसरलेल्या बहुसंख्य गरीब दुबळयांची स्तिथी वर्षानुवर्षे वाढतच आहे. याच्या मुळाशी काय करणे आहेत हे शोधून त्यावर मलमपट्टी ऐवजी कायमचा इलाज करण्याची गरज आहे. यावर राजकीय आणि आर्थिक धोरण बदलण्याचे खरे आव्हान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वेळोवेळी व्यक्त केलेल्या विचारातून 'स्टेट अँड मायनॉरिटी' या पुस्तकात लोकशाही समजवादाची मुलभूत तत्वे हिरीरीने मांडली आहेत. वरील आव्हानाला सामोरे जात असताना सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय व मानसिक परिवर्तनासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेला सम्यक क्रांतीचा मार्ग पुढे सुरु ठेवायला हवा असे वाटते.

आजही देशातील पन्नास टक्के जनता अर्धनग्न व अर्धपोटी राहते याबद्दल कोणालाच काही वाटत नाही. यावर केवळ सामाजिक माध्यमातून चर्चा करणे, फोटो प्रसारित करणे एवढे करून चालणार नाही तर आपल्या संपत्तीतील काही वाटा जे भुकेलेले व गरजू आहेत त्यांना दिला तर आपणही लोकशाही राष्ट्रात राहतो याचा ते अभिमान बाळगतील अन्यथा त्यांना लोकशाही काय आणि हुकूमशाही काय यात फारसा फरक वाटणार नाही.

आज लोकशाहीला लष्करी राजवट, हुकूमशाही, एकाधिकारशाही यांचा फार मोठा धोका निर्माण झाला असून सर्वांनी एकत्रित येऊन लोकशाहीला असणारे धोके ओळखून त्यावर उपाययोजना आखणे व लोकशाहीची वाटचाल मानवतेच्या मार्गाने करणे अत्यंत आवश्यक आहे. लोकशाही ही केवळ एक शासनपद्धती नसून तो एक जीवन मार्ग आहे याची जाणीव सर्वांनी ठेवून लोकशाहीला बळकटी देणे आवश्यक आहे तसे झाल्यास लोकशाही हे सर्व मानवतेचे तत्त्वज्ञान बनण्यास वेळ लागणार नाही.

**संदर्भ ग्रंथ**


- डॉ. पंचशील एकंबेकर, भारतीय लोकशाही आणि कल्याणकारी राज्य, अरुणा प्रकाशन लातूर २०१७
- डॉ राजशेखर सोलापूरे, लोकशाही आणि निवडणूक प्रक्रिया, अरुणा प्रकाशन लातूर,  २०१७
- डॉ राजशेखर सोलापूरे, राजकीय सिद्धांताची रूपरेषा, अरुणा प्रकाशन लातूर,  २०१८
- कृ. दि. बोराळकर, राज्यशास्त्र, विद्याबुक पब्लिशर्स, औरंगाबाद २०००
- अश्विनी सोनवळे, राज्यशास्त्र, विद्या पब्लिकेशन, लातूर २००७


**Cite This Article:**

***डॉ माधव नरहरी कांबळे,*** *(2022) स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष आणि लोकशाही पुढची आव्हाने,* ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No XI (Special Issue-I), 191-194.*